मुंबई विद्यापीठ
क्र.वि.क./470 /२००८

परिपत्रक

प्राचार्य / संचालक कला, संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व्यवस्थापन, औषध निर्माणशास्त्र, व तत्सम महाविद्यालये, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

दीपक वसावे
उपकुलसचिव
(विशेष कक्ष)

स्थळ: - मुंबई.
दिनांक: - 24 ऑक्टोबर, २००८

---

क्र. सहसं/उशि/मु.वि./अल्पसं/२००८/०९/

प्रति,
कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२
कुलसचिव,
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.

विषय :- अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण अभ्यासक्रम पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती

संदर्भ :- मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/अल्पसं/२००८-०९/ जाहिरात/१४-अई, दि. ०८/०८/२००८ व दि. २०/०८/२००८.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन, मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडील संदर्भिय जाहीर प्रकटनास अनुसरुन कळविण्यात येते की, सन २००८-०९ या वर्षाकरिता अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने शिष्यवृत्तीची तपशिलवार माहिती, अर्जाचा नमुना, अर्ज करावयाची कार्यपध्दती, पात्रता, अभ्यासक्रमाची यादी व विद्यार्थ्यांना संस्था/ महाविद्यालयांमार्फत अर्ज सादर करावयाचे वेळापत्रक इत्यादी बाबत सूचना निर्गमित केल्या असून, त्या बाबतची अधिक माहिती www.minorityaffairs.gov.in, www.Dirhe.org.in व www.dte.org.in.com या संकेत स्थळांर उपलब्ध आहे.

विद्यार्थ्यांनी त्यांचे आवेदनपत्रे ही ३१/१०/२००८ अखेर संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक, यांचेकडे सादर करावयाची असून, सर्व संबंधित शैक्षणिक संस्थांच्या प्रमुखांनी सर्व प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन परिपूर्ण व बिनचूक भरलेले अर्ज हे दिनांक १०/११/२००८ पूर्वी नोडल ऑफिसर यांचेकडे सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांचे आवेदन पत्रात मुद्दा क्र.१८ व २४ वर अनक्रमे संबंधित विद्यार्थी व संस्था प्रमुख प्राचार्य/संचालक यांचे नावे नजीकच्या "बँक ऑफ महाराष्ट्र" शाखेत खाते उघडून त्या संबंधित माहिती व खाते क्रमांक देणे बंधनकारक असल्याचे कळविलेले आहे.

संबंधित प्रकरणी आपल्या विद्यापीठांशी संलग्नीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या निदर्शनास आणून अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती संबंधीचे आवेदन पत्रे एकत्रित संकलित करुन सादर करण्याचे तात्काळ कळविण्यात यावे. तसेच पूर्ण व विहित कालावधित संस्थेमार्फत प्राप्त झालेल्या अर्जांचाच विचार केला जाईल. विद्यार्थ्यांकडून परस्पर प्राप्त व अपूर्ण किंवा विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज फेटाळले जातील. अशी मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी दिलेली सूचना ही सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
सहसंचालक
उच्च शिक्षण मुंबई विभाग, मुंबई

# उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

## अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण अभ्यासक्रम : पोस्टमॅट्रीक शिष्यवृत्ती

केंद्रीय अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाने **मुस्लीम, शिख, बौध्द, ख्रिश्चन व पारशी** या समाजातील इयत्ता ११, १२ वी व उच्च शिक्षण अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांकरिता पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना २००७-२००८ पासून लागू केलेली आहे.

या जाहिरातीव्दारे शैक्षणिक वर्ष २००८-२००९ करिता **नवीन शिष्यवृत्ती व नूतनीकरणासाठी** अर्ज मागविण्यात येत आहेत.

**शिष्यवृत्तीसाठी समाविष्ट अभ्यासक्रम** : या शिष्यवृत्तीसाठी कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखेतील ११, १२ वी पदवी व पदव्युत्तर पदवी, एम. फील व पीएच.डी. अभ्यासक्रम, शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील पदवी व पदव्युत्तर पदवी, एम. फील व पीएच.डी. अभ्यासक्रम, शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील पदवी व पदव्युत्तर एम. फील व पीएच.डी. अभ्यासक्रम, तांत्रिक व व्यावसायिक क्षेत्रातील सर्व पदविका अभ्यासक्रम (DIPLOMA COURCES) आणि मेरीट कम मीन्स या शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत समाविष्ट नसलेले सर्व पदविका स्तरावरील अभ्यासक्रम (DIPLOMA COURCES) तसेच आय.टी.आय., एम.सी.व्ही.सी. बायफोकल आणि एन. सी.व्ही.टी. चे अभ्यासक्रमांचा अंतर्भाव आहे.

**किमान पात्रता व अटी** :-

१. अर्जदार **भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी** असावा.
२. किमान ५० **टक्के गुण** प्राप्त झालेला विद्यार्थी पात्र राहिल.
३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
४. अर्जदाराच्या पालकाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये २.०० **लाखापेक्षा** जास्त नसावे.
५. मागील वार्षिक परिक्षेत **५० टक्के गुण** असलेले विद्यार्थी नूतनीकरणासाठी पात्र असतील.

**योजनेची सविस्तर माहिती व अर्जाचा नमुना** : शिष्यवृत्तीची तपशीलवार माहिती, अर्जाचा नमुना, अर्ज करावयाची पध्दती, पात्रता, अभ्यासक्रमाची यादी व विद्यार्थ्यांनी संस्थेमार्फत अर्ज सादर करावयाचे वेळापत्रक इत्यादी माहिती शासनाच्या खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज डाऊनलोड करुन पूर्ण भरुन त्यांच्या संस्थेकडे सादर करण्याचा अंतिम **दिनांक ३१ ऑक्टोबर, २००८** असा आहे. सर्व संबंधित शैक्षणिक संस्थांचे मुख्याध्यापक / प्राचार्य / अधिष्ठाता यांना कळविण्यात येते की, सर्व प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याची व अर्ज नोडल ऑफीसरकडे **दिनांक १० नोव्हेंबर, २००८** सादर करण्याची जबाबदारी त्यांची असेल. विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मंजूर झाल्यास सदर रक्कम विद्यार्थ्यांच्या व संस्थेच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

सदर शिष्यवृत्तीसंबंधी सविस्तर माहिती www.minorityaffairs.gov.in, www.dte.org.in.com, www.dirhe.org.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

विहित कालावधीत संस्थेमार्फत प्राप्त झालेल्या अर्जांचाच विचार केला जाईल. विद्यार्थ्यांकडुन परस्पर प्राप्त झालेले अर्ज किंवा अपूर्ण अर्ज अस्वीकृत करुन फेटाळले जातील याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ. आर. व्ही. किर्दक)
नोडल ऑफीसर तथा संचालक, उच्च शिक्षण.

# सुचना

अलसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन २००८-०९ मधील लाभासाठी दिनांक १०/११/२००८ पर्यंत सर्व महाविद्यालयांकडून लाभार्थी विद्यार्थ्यांचे आवेदन पत्र एकत्रित संकलित करुन सादर करणे आवश्यक आहे.

तसेच संचालनालयाच्या www.dhe.org.in या वेबसाईट वरुन तपशिलवार माहिती व आवेदन पत्राचा नमुना घेऊन बिनचुक व परिपूर्ण भरण्यात यावा. आवेदन पत्रातील मुद्दा क्र. १८ व २४ वर अनुक्रमे संबंधित विद्यार्थी व प्राचार्य यांचे नावे नजीकच्या "बँक ऑफ महाराष्ट्र" शाखेत खाते उघडून त्या खाते क्रमांकासह मुद्दांमधील क्र. १ ते ८ ची माहिती देणे बंधनकारक असल्याचे मा. संचालक उच्च शिक्षण, पुणे यांनी कळविलेले आहे. निर्धारित केलेल्या कालमर्यादेनंतर आलेली आवेदन पत्रे स्विकारली जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आदेशान्वये